# प्रकरण २ रे

## विश्लेषण पद्धती व आकडेवारीचे संकलन

२.१ संशोधनाची गरज

२.२ नमुना निवड

२.३ अभ्यासाची उद्दिष्टये

२.४ संशोधनाचा आराखडा

२.५ आकडेवारी व माहितीचे संकलन

२.६ संशोधनाच्या मर्यादा

२.७ विश्लेषण रचना

## २·१ संशोधनाची गरज :

भारत हा शेतीप्रधान देश आहे· भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६९ टक्के लोक खेडयात राहत असून, त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे· भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी ३० ते ३५ टक्के राष्ट्रीय उत्पन्न शेतीक्षेत्रातून मिळते· संपूर्ण देशाला अन्नधान्य पुरविण्याची जबाबदारी शेती क्षेत्रावरच आहे· वाढत्या लोकसंख्येबरोबरच भू-क्षेत्र वाढत नाही· त्यासाठी शेतकरी संयोजक शेती क्षेत्रातल्या निरनिराळया योजना, नवनवीन तंत्र, बी-बीयाणे, रासायनिक खतांचा उपयोग करुन शेती उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो· परंतु हया शेतक-याला स्वत:च्या शेतमालाच्या विक्री बाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नाही, त्याची जबाबदारी दुस-यावर आहे· स्वत: निर्माण केलेल्या शेतमालाला पाहिजे त्या किंमतीला विकता येत नाही· याबाबत शेतकरी परावलंबी आहे· आपला शेतमाल कोणत्या किंमतीला विकला गेला याची सुध्दा कांही वेळा माहिती होत नाही· अशा वेळी शेतक-यांचे अज्ञान, अडाणीपणा त्यांच्या तोटयाचा ठरतो· मिळेल त्या किंमतीला आपला शेतमाल विकावा लागतो· ही शेतक-यांची आगतिकता आहे· शेतकरी वर्ग संख्येने मोठा आहे, पण असंघटीत आहे, त्यामुळे संघटीत व आर्थिकदृष्टया प्रबळ असे व्यापारी व दलाल त्यांची पिळवणूक करतात· ही एक प्रकारची आर्थीक कत्तलच आहे·

शेतक-यांची आर्थिक फसवणूक कमी करण्यासाठी भारत सरकारने अनेक उपाय केलेले आहेत· त्यामध्ये एक उपाय म्हणून नियंत्रित बाजार पेठा स्थापन केल्या· शेतकरी व व्यापारी या दोन्ही पक्षानी समानतेच्या तत्वावर शेतमालाची विक्री व खरेदी करावी, कोणत्याही पक्षाने दुस-या पक्षाच्या अज्ञानाचा फायदा, तसेच असंघटीतपणाचा फायदा घेऊ नये, एक दुस-यावर अन्याय करु नये आणि कसल्याही प्रकारची फसवणूक होऊ नये, यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी नियंत्रित बाजारपेठांची स्थापना करण्यात आली आहे· सहकारी तत्वावर

आधारीत अशा या नियमित बाजारपेठा शेतक-यांच्या शेतमालाला उघड लिलाव पध्दतीने भाव ठरवून देतात. तरीसुध्दा व्यापारी आणि दलाल आपला फसवणूकीचा स्वभाव सोडले नाहीत. त्यांच्या संघटीत डावपेचांवर आणि नियंत्रणावर मोठयाप्रमाणावर सौदा शक्ती निर्माण करुन शेतक-यांवर ते वर्चस्व सिध्द करतात. नियंत्रित बाजारपेठांच्या स्थापनेनंतर सुध्दा व्यापारी व दलालांचे वर्चस्व कमी झालेले नाही. सहकारी खरेदी विक्री व्यवस्था कार्यक्षम आणि परिणामकारक बनत नाहीत. अशा पार्श्वभूमीवर नियंत्रित बाजार पेठांचा अभ्यास करावा, त्यांच्या पणन पध्दतीतील सहभाग, आणि भूमिका समजावून दयावी, या हेतुने प्रस्तुत प्रबंधाचा विषय निवडलेला आहे.

२.२ <u>नमुना निवड</u> :

नियंत्रित बाजारपेठांचा अभ्यासविषय निवडल्यानंतर कोणत्या नियंत्रित बाजारपेठेची निवड करावी हा प्रश्न उपस्थित झाला. तथापि संशोधकाच्या सोयीने मुद्दामहुन, बार्शी कृषी-उत्पन्न बाजार समितीची निवड केली. ही नियंत्रित बाजारपेठ स्थापन होऊन ४० वर्षापेक्षा जास्त कालखंड झालेला आहे. हा कालखंड अभ्यासासाठी पुरेसा आहे. यानंतर प्रश्न निर्माण झाला तो सर्व शेतमालाचा अभ्यास करावयाचा का कांही विशिष्ट शेतमालाचा अभ्यास करावा. तेलबियांच्या बाबतीत भारत सरकारचे क टेक्नॉलॉजी मिशन कार्यरत आहे. सातत्याने वाढत जाणारी खाद्य तेलाची मागणी आणि त्याच्या तुलनेने पुरवठयातील कमतरता यामुळे भारत सरकारला, वर्षाला मोठयाप्रमाणावर खाद्य तेलाची आयात करावी लागते. हया दृष्टीने तेलबियांच्या अभ्यासविषयाकडे लक्ष केंद्रित केले आहे. आणि म्हणून बार्शी बाजार आवारातील तेलबियांची विक्री व्यवस्था : एक मुल्यमापन असा विषय निवडला. याशिवाय तेलबियांना बार्शी बाजारात चांगली मागणी आहे, चांगली किंमतही मिळते, आणि विशेष म्हणजे त्यांचे उत्पादनही त्या परिसरात चांगले होते. बार्शी बाजार, शेतमालाच्याबाबतीत संपूर्ण देशात प्रसिध्द आहे. याशिवाय तेलबियांवर प्रक्रिया करणारे तेलगिरण्यांची

संख्याही पुरेशी आहे. म्हणजे मागणी / पुरवठयाच्यादृष्टीने अभ्यासाला विशेष महत्व येईल असे वाटल्यावरुन हा विषय निवडला.

२.३ अभ्यासाची उद्दिष्टे :

१) बार्शी तालुक्यातील पिकांचा आकृतीबंध अभ्यासणे,

२) पिकांच्या आकृतीबंधावर परिणाम करणा-या घटकांचा अभ्यास करणे,

३) तेलबियांचा उत्पादन खर्च व उत्पादकता अभ्यासणे,

४) बार्शी बाजार आवारात येणा-या एकूण शेतमालाची आवक, किंमत, प्रत्येकाची तेलबियांची सरासरी किंमत आणि त्यांची उत्पादकता याचा आढावा घेणे,

५) बार्शी बाजार आवारातील एकूण शेतमालाच्या आवकामध्ये आणि किंमतीमध्ये तेलबियांचे शेकडा प्रमाण अभ्यासणे,

६) तेलबियांवर प्रक्रिया करणा-या तेलगिरण्या व तेलघाणींची मागणी व बाजार आवारातून तेलबियांचा होणारा पुरवठा यासंबंधीचा अभ्यास करणे इ.

उद्दिष्टे समोर ठेवून बार्शी बाजार आवारातील तेलबियांची विपणन व्यवस्था अभ्यासलेली आहे.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाल्यानंतर १० वर्षे, म्हणजे १९४९ ते १९५९ या कालखंडाची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून १९५९-६० ते १९८६-८७ या काळातील बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील उलाढालीचा अभ्यास केलेला आहे.

२.४ संशोधनाचा आराखडा :

इ.स.१९३९ मध्ये मुंबई सरकारने, अॅग्रीकल्चरल प्रोडयूस मार्केट अॅक्ट नांवाचा कायदा संम्मत केला. हया कायद्यानुसार, १ ऑगस्ट,१९४७ रोजी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाली. पण प्रत्यक्ष कामकाज १५ नोव्हेंबर,१९४९ पासून सुरु झाले. या बाजार समितीच्या कामकाजाचा कालखंड ४० वर्षे पेक्षा जास्त आहे. समितीच्या स्थापनेनंतर १९४९ ते ५९ या काळा-

तील अहवाल उपलब्ध होउ शकले नाहीत, म्हणून १९५९-६० ते १९८६-८७ या २७ वर्षाचा कालखंड अभ्यासासाठी घेतला. हा कालखंड अभ्यासाच्या दृष्टीने पुरेसा आहे. या कालखंडातील आवकाचा आकृतीबंध, किंमत पातळी, तालुक्यातील पीकांचा आकृतीबंध इ. : गोष्टींचा तपशील पहिलांदा मिळविला आणि त्याचे विश्लेषण केले. विशेषत: तेलबियांचा, आमचा खास अभ्यास असल्यामुळे तेलबियांची आवक प्रवृत्ती, किंमत प्रवृत्ती, सरासरी उत्पादकता, लागवडीचे प्रमाण इत्यादी गोष्टींचाही परामर्श घेतला. तेलबियांणांची मागणी करणा-या घटकापर्यंन्त पोहचून त्यांच्या मागणीप्रवृत्तीचाही अभ्यास केला. तेलघाणी, तेलगिरण्या यांच्या मालकांच्य बरोबर चर्चा केली आणि अभ्यासाला उपयुक्त अशी माहिती मिळविली. शेतक-यांच्या बरोबर चर्चा करुन सुर्यफूल व भुईमूगाचा उत्पादन खर्च मोजण्याचाही प्रयत्न केला. इतर तेलबियांचा उत्पादनखर्च मोजणे अवघड आहे, कारण ती आंतरपिके म्हणून घेतली जातात.

## २.५ आकडेवारी व माहितीचे संकलन :

प्रस्तुत अभ्यासासाठी लागणारी माहिती व आकडेवारी मिळविण्यासाठी प्रामुख्याने दुय्यम स्तरातील आकडेवारीचा वापर केलेला आहे. यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल, जिल्हा साख्यकि, जनगणना, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, इत्यादी संबंधीचा आधार घेतला आहे. जेथे दुय्यम माहिती अपुरी वाटली किंवा दुय्यम माहिती मिळाली नाही अशा ठिकाणी प्रत्यक्ष जाउन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकरी, तेलघाणीचे मालक, तेलगिरण्याचे संयोजक अथवा मालक यांच्याकडून आवश्यक ती प्राथमिक आकडेवारी व माहिती मिळविण्याचाही प्रयत्न केला आहे. अनेक लोकांनी माहिती देण्यात टाळाटाळ किंवा नकार दिला. तरीपण प्रातिनिधीक अशा तेलगिरण्यांचा अभ्यास करता आला.

२·६ संशोधनाच्या मर्यादा :

१) प्रस्तुत अभ्यासविषयाचा कालखंड १९५९-६० ते १९८६-८७ पर्यंतचा आहे. तरीपण या काळातील कांही वर्षांचे वार्षिक अहवाल मिळू शकले नाहीत. म्हणून कांहीवर्षांची माहिती दिली नाही.

२) अभ्यास कालातील इ.स. १९५९-६० व १९६०-६१ हया दोन वर्षातील आवक पोत्यामध्ये आहे. म्हणून कांही ठिकाणी १९६१ नंतरच्या बाजार प्रवृत्तीचे विश्लेषण केले आहे. बार्शी शहरात तेलबियांचा प्रक्रिया करुन तेल व पेंड निर्माण करणारे एकूण १२ तेलगिरण्या (एक्सपिलर्स) व तेलघाणी(रोटरी) आठ आहेत. प्रत्येक तेलगिरणीला व तेलघाणीला प्रत्येक वर्षाला एकूण किती तेलबिया लागतात या बाबतची दुय्यम आकडेवारी मिळू शकली नाही. तरीसुध्दा कांही तेलगिरण्या व तेलघाणीमध्ये प्रत्यक्ष जाउन निरिक्षण व मुलाखती घेउन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. माहिती देणे त्यांच्यावर बंधनकारक नाही, आणि आपल्या व्यवसायातील गूपीते इतरांना माहिती होउ द्यावयाचे नाहीत या हेतुने तेलगिरणीकडून हवी ती माहिती मिळाली नाही.

२·७ विश्लेषण रचना :

प्रकरण क्रमांक १ मध्ये भारतातील विपणन व्यवस्थेचे मुल्यमापन केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्वातंत्र्य पूर्व काळातील व स्वातंत्र्यानंतरच्या कांही वर्षात भारतातील शेतमालाच्या विपणन व्यवस्थेत कोणते दोष होते, ते दूर करण्यासाठी कोणते उपाय अंमलात आणले गेले या संबंधीचे वर्णन आहे.

दुस-या प्रकरणामध्ये विश्लेषण पध्दती व तथ्यसंकलन पध्दती स्पष्ट करुन संशोधनाच्या मर्यादा मांडलेल्या आहेत.

तिस-या प्रकरणामध्ये तेलबियांचे महत्व, भारतातील तेलबियांचे लागवडीखालील क्षेत्र, एकूण उत्पादन व दरहेक्टरी उत्पादकता स्पष्ट करुन भारतातील तेलबियांची मागणी व पुरवठा यातील फरक प्रस्तुत केलेला आहे. तेलबियांचे

उत्पादन वाढविण्यासाठी सर्वसामान्य प्रयत्न व भारतसरकारने अंमलात आणलेले टेक्नॉलॉजी मिशन या सारख्यास खास प्रयत्यांचे विश्लेषणही केले आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये बार्शी तालुक्याची आर्थिक, व्यापारी, व औद्योगिक रुपरेषा दिली आहे. त्यामध्ये तालुक्याचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ नद्या, धरणे, हवामान व पर्जन्यमान व सहकारी संस्थाची माहिती देऊन शहराची व्यापारी व औद्योगिक परंपरेचाही आढावा घेतलेला आहे.

पाचव्या प्रकरणात बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना, विकास, शेतमालाचे नियमन, बाजार समितीची अर्थव्यवस्था इ.ची माहिती दिली आहे. बाजार आवारातील विविध प्रकारच्या अनुज्ञाप्तीधारकांची संख्या, शुल्कदर, विक्रीदर व खरेदीदार यांच्यावर बसविलेली हमाली, व तोलाईदारांची-ही माहिती दिली आहे.

प्रकरण ६ मध्ये बार्शी तालुक्यातील तेलबिया वगळून इतर शेतमालांच्या लागवडी खालील क्षेत्र, आवक व त्यांच्या मुल्याचे विश्लेषण केले आहे.

प्रकरण क्रमांक ७ मध्ये बार्शी तालुक्यातील तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्र, आवक व त्यांची किंमत यांचा आढावा घेतला आहे. शिवाय तेलबियांवर प्रक्रिया करणा-या शहरातील तेलगिरण्या (एक्सपिलर्स) आणि तेलघाणी( रोटरी ) यांच्याकडून व्यक्त होणारी मागणी आणि बाजार आवारातून होणारा पुरवठा यांचाही आढावा घेतला आहे. तसेच तेलबियांची पणन वैशिष्टये, त्यातील दोष आणि पणन पध्दती सुधारण्यासाठी कांही उपाययोजनाही सुचविल्या आहेत. शेवटी तेलबियांचा उत्पादनखर्च मोजण्याचा प्रयत्न केला आहे.

आणि शेवटी प्रकरण आठमध्ये संपूर्ण अभ्यासाचा उपसंहार दिला आहे. आणि सोबत कांही शिफारशीवजा सूचनाही केलेल्या आहेत.

=0=0=0=0=0=